# शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती यांचे समोर

तक्रार अर्ज क्रं ०१/२०१८ ते ०३/२०१८

१. शेख सादिक गुलमहमद

२. पाटील उत्तम बळवंत

३. जाधव आनंदा चंदु

} तक्रार अर्जदार

विरूदध

१. प.पू.स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था, शिराळा.

२. बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड

} वि. प

**तक्रार अर्ज क. ०४/२०१८ ते ०६/२०१८**

४. माने रामराजे हणमंतराव

५. सावंत हेमंत राजाराम

६. घोलप सुनिल साधु

} तक्रार अर्जदार

विरूदध

१. प.पू.स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था, शिराळा.

२. विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा.

} वि. प

**तक्रारीचे स्वरूप :—**

परमपुज्य स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था शिराळा, ता.शिराळा, जिल्हा सांगली या संस्थेतील बाबा नाईक महाविद्यालय कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली व विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा ता.शिराळा, जि.सांगली येथील एकूण ६ शिक्षक (तक्रारदार) यांनी दिनांक २०/१२/२००६ व दिनांक २२/१२/२००६च्या तक्रार अर्जादवारे तक्रार निवारण समिती शिवाजी विद्यापीठ यांच्याकडे स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केले आहेत.

## तक्रारदार शिक्षक यांच्या संक्षीप्त स्वरुपात तक्रारी खालीलप्रमाणे

- श्री. शेख सादिक गुलमहमद यांची नेमणूक हिंदी विषयाकरिता दिनांक–३१/०८/१९९८ ते तक्रार अर्ज दिनांक २०/१२/२००६ पर्यंत नियमित व रितसर वेतन मिळेणेबाबत
- श्री. पाटील उत्तम बळवंत यांची नेमणूक इंग्रजी विषयाकरिता दि. १७/०६/२००१ ते १५/०६/२००४ व दिनांक ०६/१२/२००४ ते तक्रार अर्ज दिनांक २०/१२/२००६ पर्यंत नियमित व रितसर वेतन मिळेणेबाबत
- श्री. जाधव आनंदा चंदु यांची नेमणूक अर्थशास्त्र विषयाकरिता अर्ज दिनांक–३१/०८/१९९८ ते तक्रार अर्ज दिनांक २०/१२/२००६ पर्यंत नियमित व रितसर वेतन मिळेणेबाबत
- श्री. माने रामराजे हणमंतराव यांची नेमणूक रसायनशास्त्र विषयाकरिता जून १९९९ पासून ते तक्रार अर्ज दिनांक २२/१२/२००६ पर्यंत नियमित व रितसर वेतन मिळेणेबाबत
- श्री. सावंत हेमंत राजाराम यांची नेमणूक भूगोल विषयाकरिता दिनांक. २०/०६/१९९९ पासून तक्रार अर्ज दिनांक २२/१२/२००६ पर्यंत नियमित व रितसर मिळेणेबाबत
- श्री. घोलप सुनिल साधु यांची नेमणूक वनस्पतीशास्त्र विषयाकरिता जून १९९९ पासून ते तक्रार अर्ज दिनांक २२/१२/२००६ पर्यंत नियमित व रितसर वेतन मिळेणेबाबत
- सदर तक्रारदारांच्या तक्रारीमध्ये साम्य असून त्यांनी विद्यापीठाच्या नियमानुसार त्यांना नियमित वेतन मिळालेले नाही, म्हणून नियमित व रितसर वेतन मागील थकीत वेतनासह मिळणेकरिता तक्रार अर्ज दाखल केले आहेत. मा. उच्च न्यायालयाकडील याचिका क्रं ११७२/२००२ मधील दि.१८/४/२००२ रोजीच्या आदेशाचा त्यास आधार घेतला आहे. तसेच, त्याबाबत संस्थेकडे वेळोवेळी लेखी व तोंडी मागणी करूनही त्याची दखल घेतली नाही, असे तक्रारदारांनी तक्रारीमध्ये नमुद केले आहे. सदर तक्रारी अर्ज व त्यास अनुषगींक कागदपत्रे तक्रारदार यांनी पुर्वीच्या तक्रार निवारण समितीपुढे चौकशी कामी सादर केली आहेत. विद्यापीठाच्या पूर्वीच्या स्टॅटयूटनुसार गठीत असलेल्या तक्रार निवारण समितीने त्या अर्जांची चौकशी केली. दिनांक ६/०२/२००८ रोजी सदर सहा ही तक्रारदारांच्या तक्रारींचे स्वरुप

एकसारखेच असले कारणाने समितीने त्याबाबतचा एकत्रीत ठराव करून व्यवस्थापन परिषद शिफारस केली.

तक्रार निवारण समितीने सदर तक्रारीबाबत संस्थेचे अध्यक्ष आणि प्राचार्य यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याचे दिसून येते. त्यांनी तक्रार निवारण समितीसमोर उपस्थित राहून आपले म्हणणे मांडलेचे दिसून येते. परंतु संस्थेचे अध्यक्ष यांनी तक्रारदाराच्या तक्रारीबाबत निर्णय घेण्यासाठी दि.१६ फेब्रुवारी, २००८ पर्यंत मुदत मिळावी अशी विनंती केली. वरील तक्रारदारानी आपल्या तक्रारीबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, अशा आशयाचे पत्र समितीस सादर केले आणि त्या पत्राची दखल घेवून 'तक्रारदार शिक्षकांची नियमानुसार थकीत पगार रक्कम संस्था/महाविद्यालयाने पत्र दिनांकपासून एक महिन्यात अदा करावी, असा ठराव केला त्यास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ५७(2) नुसार दिनांक १६/२/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने त्यास अंतिम मंजूरी दिली होती.

सदर व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयावर नाखुश होवून संस्थेने मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक १३५३/२०१० दाखल केली. याचिका क्रं १३५३/२०१० व ४१४०/२०१६ मध्ये मा.न्यायमुर्ती श्री.बी.आर.गवई आणि मा.न्यायमुर्ती श्री.संदीप शिंदे यांच्या खंडपीठासमोर असे निदर्शनास आले की यातील संस्था चालकांना त्यांची बाजू व्यवस्थापन परिषदेसमोर मांडणेकरिता संधी देण्यात आली नव्हती. या सबबीखाली, पूर्वीचे तक्रार निवारण समितीचे आदेश दूर करण्यात आले आणि वर नमुद शिक्षकांच्या तक्रारीची फेर चौकशी करण्यात यावी व त्यामध्ये उभय पक्षकारांना आपली बाजू सविस्तरपणे मांडण्यासाठी संधी देण्यात यावी, असे सूचित करण्यात आले. तो, आदेश दि. ८/११/२०१७ रोजीचा आहे.

तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७९ च्या तरतुदीनुसार शिवाजी विद्यापीठाची तक्रार निवारण समिती गठीत झालेली नव्हती. कलम ७९(सी) नुसार मा.कुलपती नामनिर्देशित सदस्य व कलम ७९(इ) नुसार अधिसभेमधून एक शिक्षक व एक शिक्षकेत्तर सदस्य यांचे नाम निर्देशन झालेले नव्हते. त्यामुळे समिती पूर्णत: गठीत होण्यास विलंब झाला. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात नमुद केलेल्या निर्देशानुसार मुदतीत सदर प्रकरण चौकशीसाठी समितीसमोर येवू शकले नाही. त्यामध्ये जाणीवपूर्वक असा कोणताही विलंब झालेला नाही. तथापि, तक्रार निवारण समिती गठीत झाल्यानंतर सदरील प्रकरण अगदी सुरूवातीस चौकशीसाठी घेण्यात आले व उभय

पक्षकारांना त्याची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देण्यात आली. त्यास अनुसरून तक्रारदार शिक्षक, संस्थेतर्फे अध्यक्ष, सचिव आणि संबंधीत दोन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी आपली बाजू सविस्तरपणे मांडली. तक्रारदार, संस्था व महाविद्यालय यांनी २२/०३/२०१८ दिवशी आपले म्हणणे सादर केले.

**संस्थेचे म्हणणे :–**

संस्था अध्यक्ष सचिव व महाविद्यालय प्राचार्य यांनी आपली बाजू मांडली की, सर्व तक्रारदार शिक्षक हे तात्पुर्त्या स्वरूपात सेवेत होते. यु.जी.सी. च्या नियमानुसार विद्यापीठाच्या विहीत निवड समिती मार्फत निवड होवून ते सेवेत आलेले नाहीत. तक्रारदार शिक्षकांची स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्ती झाली आहे. जरी सदर शिक्षकांना पूर्णवेळ मान्यता दिली असली तरी ते नेट, सेट उत्तीर्ण झालेले नाहीत व शासनाच्या नियमानुसार त्यांची नियुक्ती झालेली नाही. तक्रारदार शिक्षक यांनी जोडलेले वेतन तक्ते व वेतनासंबंधी दिलेली माहिती चुकीची आहे. त्यांनी ५वे व ६वे पे स्केल मागितले आहे. परंतु, तसे त्यांना मिळू शकत नाही. कारण, तशी त्यांची शैक्षणिक अर्हता नाही. शासनानेही सदर शिक्षकांचे वेतन व कार्यभार पे स्केल प्रमाणे मंजूर केलेले नाही. सदर शिक्षकांनी किती तासिका घेतल्या यापेक्षा शासनाने त्यांना किती तासिका मंजूर केलेल्या होत्या हे विचारात घ्यावे. कारण, शासनाने त्यांना फक्त सीएचबी तासिकांसाठीचे कार्यभार व वेतन मंजूर केलेले आहे. कारण, पूर्णवेळ कार्यभार त्यांना मंजूर करण्यासाठी तशी पात्रता त्यांच्याजवळ नव्हती. त्यावेळी संस्थेने सदर शिक्षकांना वेळोवेळी दिलेल्या पगाराची माहिती त्यांच्या म्हणण्यासोबत दि. २२/०३/२०१८ व २३/०४/२०१८ रोजी दाखल केली आहे.

संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रांची पहाणी करून सदर तक्रारदार शिक्षकांना ते कागदपत्र मान्य अगर अमान्य असल्याचे तपासून आपले म्हणणे द्यावे असे सूचित करण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर शिक्षकांना सर्व कागदपत्रांची जातीने तपासणी करून त्यामध्ये काही त्रूटी निदर्शनास आणल्या. या सर्व बाबींचे विचार करून समितीने संबंधीत संलग्नता विभागाकडून तक्रारीबाबत कार्यालयीन माहिती प्राप्त केली. प्राप्त माहितीमध्ये तक्रारदार यांना पूर्णवेळ मान्यता दिल्याचे दिसून येते. तक्रारदारांची मान्यतेबाबतची कार्यालयीन माहिती, सोबत परिशिष्ट अ,ब, क, ड, इ, ई जोडली आहे. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठाच्या नियमानुसार सदर शिक्षकांचे कार्यभार पूर्णवेळ असल्यामुळे त्यांना विद्यापीठाची पूर्णवेळ मान्यता दिली गेली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांचे लेखी निवेदन, तसेच सादर केलेली नियुक्तीपत्रे, कागदपत्रे तसेच संस्थेने दाखल केलेले म्हणणे व कागदपत्रे विचारत घेता खालील निरीक्षणे करण्यात आली.

१. उपरोक्त तक्रारींच्या अनुषंगाने संस्थेने तक्रारदार यांना दिले गेलेले वेतनाबाबत पगारपत्रक १९९७ ते २००३/०४ (Accompaniment to Perform No.2 Advance salary Grants Bills Exibit3 page no. 19-82) जोडले आहेत.

२. संस्थेने आपल्या दि. २१/०३/२०१८ लेखी निवेदनात वेतन तपशिल दिला आहे. त्यामध्ये वेतन दिले असे नमुद आहे. परंतु नियुक्ती आदेशा प्रमाणे वेतन दिल्याचे कोठेही नमुद नाही किंवा नियमानुसार रितसर वेतन दिले आहे असे संस्था/महाविद्यालयाचे कथन दिसून येत नाही.

३. तक्रारदारांनी सन १९९९ पासून च्या पगार पत्रकावर २००४ सहया घेतल्या व काही ठिकाणी त्यांच्या बोगस सहया केल्या असे नमूद केले. परंतु त्याबाबत ठोस पुरावा समिती समोर आलेला नाही.

४. संस्थेने रितसर/नियमानुसार पगार अदा केले बाबत चा ठोस पुरावा समिती समोर दाखल केलेला नाही.

५. संस्थेने तक्रारदार यांना दिलेले नियुक्ती आदेश वेतनश्रेणी नमुद करून दिलेली आहेत.

६. तक्रारदार शिक्षकांना विद्यापीठाची पूर्णवेळ मान्यता दिल्याचे दिसून येते.

७. सदर तक्रारदार यांनी संस्थेच्या महाविद्यालयामध्ये त्या कालावधी वरिल मुदतीत काम केले असल्याचे नाकारलेले नाही.

८. सर्व विषयाची या समितीच्या सर्व सदस्यांनी एकत्रितपणे अभ्यास केला तेव्हा असे दिसून आले की, वेळोवेळी शासन निर्णयानुसार टप्प्या टप्प्याने २००१–०२ पासून सदर दोन्ही महाविद्यालये २००४–०५ पर्यंत शासनाने पूर्ण वेतन अनुदानित केले आहेत. त्यामुळे त्यांच्या पुढील वेतनाच्याबाबतीत वादविषय विद्यापीठाच्या या तक्रार निवारण समितीच्या कार्यकक्षेत हा विषय येत नाही. सबब, समिती समोर मूळ तक्रार अर्जाच्या दिनांकापर्यंत सदरचा विषय समितीच्या कार्यकक्षेत येतो. त्यामुळे समिती एकमताने खालीलप्रमाणे निर्णय करीत आहे.

## — निर्णय —

सर्व तक्रारदार यांचा दि. २०/१२/२००६ व २२/१२/२००६ चे तक्रार अर्ज मंजुर करणेत येत आहेत. संस्थेने तक्रारदार शिक्षकांना तक्रार अर्जामध्ये मागणी केलेनुसार तक्रार अर्ज दिनांकापर्यंत रितसर व नियमित वेतन अदा करावे. सदर रक्कम हा आदेश प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यात वेतन फरकासह अदा करावे, असे आदेश देण्यात येत आहे.

समितीच्या आदेशाच्या प्रती तक्रारदार शिक्षक, संस्था तसेच प्राचार्य यांना अदा करण्यात याव्यात.

दि. १५/०५/२०१८

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

अध्यक्ष

अध्यक्ष
तक्रार निवारण समिती,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य

सदस्य

सदस्य

सदस्य

सदस्य सचिव